महाराष्ट्र शासन
वनविभाग

# विभागीय वन अधिकारी, चंद्रपूर वनविभाग, चंद्रपूर यांचे कार्यालय

**रामबाग फॉरेस्ट कॉलनी, मुल रोड, चंद्रपूर - 442401 (म.रा.)**

**E-mail :- dfochandrapur@gmail.com**

**विषय :-** दुर्गापूर ओपन कास्ट माईन प्रकल्पासाठी आवश्यक चंद्रपूर जिल्ह्यातील 80.77 हे. वनजमीनीवरील खाणपट्टा नुतनीकरणाचा प्रस्ताव.

**क्रमांक :-** कक्ष-14/सर्व्हे/जमीन/ 1799

**चंद्रपूर, दिनांक :-** 27/10/2023

**प्रति,**

मुख्य वनसंरक्षक,
चंद्रपूर वनवृत्त,
चंद्रपूर.

**संदर्भ :-** 1. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पूर्व, नागपूर यांचे पत्र क्रमांक कक्ष-1(ब)/सर्व्हे/23-24/450, दिनांक 27/07/2023.
2. आपले कार्यालयीन पत्र क्रमांक कक्ष-3(1)/जमीन/प्र.क्र.48/23-24/1660, दिनांक 24/08/2023.
3. या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-14/सर्व्हे/जमीन/1642, दिनांक 06/10/2023.
4. क्षेत्रीय महाप्रबंधक, वे.को.लि., चंद्रपूर क्षेत्र यांचे पत्र क्रमांक WCL/CHA/AGM/PLG/REV/265, दिनांक 25/10/2023.
5. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पूर्व, नागपूर यांचे पत्र क्रमांक कक्ष-1(ब)/सर्व्हे/21-22/129, दिनांक 02/06/2021.

केंद्र शासनाचे पत्र क्रमांक F.No. 8-123/2003-FC, दिनांक 08/11/2005 अन्वये विषयांकीत प्रकल्पास 1 ते 14 अटींच्या अधीन राहून अंतिम मान्यता प्रदान करण्यांत आलेली आहे. त्यातील अट क्रमांक 3 नुसार वनसंवर्धन अधिनियम 1980 अन्वये सदर प्रकल्पाची कालमर्यादा ही 8 वर्षासाठी होती. कालमर्यादा संपुष्टात येण्यापूर्वी यंत्रणेने त्यांचे पत्र क्रमांक 6157, दिनांक 01/02/2013 अन्वये नुतनीकरणाचा प्रस्ताव या कार्यालयास सादर केला. त्यानंतर विभागीय वन अधिकारी, चंद्रपूर वनविभाग, चंद्रपूर यांनी 06/02/2018 व मुख्य वनसंरक्षक, चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर यांनी दिनांक 24/12/2018 रोजी मौका तपासणी केली असता 80.77 हे. वनक्षेत्रावर काम बंद असल्याचे दिसून आले.

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पूर्व, नागपूर यांचे संदर्भिय पत्र क्रमांक 1 व 5 अन्वये दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने यंत्रणेने त्यांचे संदर्भिय पत्र क्रमांक 4 अन्वये अहवाल सादर केलेला आहे (अहवाल 3 प्रतीत सोबत जोडून सादर करण्यांत येत आहे). सदर अहवालाशी हे कार्यालय सहमत आहे.

करिता माहितीस सविनय सादर.

**सहपत्र :-** वरीलप्रमाणे.

Khade

**(प्रशांत खाडे)**
**विभागीय वन अधिकारी,**
o/c. **चंद्रपूर वनविभाग, चंद्रपूर**

**प्रतिलिपी :-** क्षेत्रीय महाप्रबंधक, वे.को.लि., चंद्रपूर क्षेत्र, पो. बाबुपेठ, चंद्रपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.

E:\D Drive\Survey\Unicode\Letter - 5.doc